# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हीसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६) द्वारा संचालित विद्यापीठ)

(वित्त व लेखा विभाग)

महात्मा ज्योतीबा फुले, शैक्षणीक परिसर, अमरावती रोड, नागपूर-४४००३३. फोन नं. ०७१२-२०५३५६५


पत्र. क्र. लेखा/832 दिनांक: 26/5/२०१८

## अधिसुचना

सर्व संबंधीताना सुचित करण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ८/५/२०१७ रोजी संपन्न झालेल्या सभेतील बाब क्र. ७१ अन्वये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला,मुलींना व विधवा पत्नी यांना विद्यापीठाचे शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क न आकारण्याबाबतच्या नियमावलीस मंजुरी प्रदान करण्यात आली असुन सदर नियमावली सत्र २०१८-१९ पासुन लागु करण्यात येत आहे.

### आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला,मुलींना व विधवा पत्नी यांना विद्यापीठाचे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क न आकारण्यासंबंधीची नियमावली.

व्यवस्थापन परीषदेने दिनांक १० ऑगष्ट २०१७ रोजी संपन्न झालेल्या सभेत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला,मुलींना व विधवा पत्नी यांना विद्यापीठाद्वारे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क न आकारण्याबाबत मंजुरी दिली असुन सदर शुल्क माफीचा प्रस्ताव सुरळीतपणे कार्यरत राहण्याच्या दृष्टीने पुढील नियमावली तयार करण्यात येते आहे.

१) या नियमावलीस "आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला,मुलींना व विधवा पत्नी यांना विद्यापीठाद्वारे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क न आकारण्यासंबंधीची नियमावली-२०१८" असे संबोधण्यात येईल.

२) शिक्षण, व परिक्षा शुल्कात सवलत देण्याबाबतची व्यवस्थापन समिती.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला मुलींकरीता व विधवा पत्नीला शिक्षण, परीक्षा शुल्क न आकारण्याबाबतची व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे राहील. याबाबतचा धोरणात्मक किंवा इतर कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार या समितीला राहील व समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | प्र-कुलगुरू | (अध्यक्ष) |
| २) | कुलगुरूंनी नामीत केलेल्या विद्यापीठाचे एक विभाग प्रमुख | (सदस्य) |
| ३) | कुलगुरूंनी नामीत केलेल्या सलग्नित महाविद्यालयाचे एक प्राचार्य | (सदस्य) |
| ४) | विद्यापीठ विद्यार्थी परीषदेचा अध्यक्ष व सचिव | (सदस्य) |
| ५) | संचालक, विद्यार्थी विकास | (सदस्य-सचिव) |

३) ही नियमावली व्यवस्थापन परीषदेच्या दिनांक ८ मे २०१८ बाब क्र. ७१ अन्वये, मान्यता दिलेल्या दिनांका पासुन अस्तित्वात येईल.

४) उद्दीष्टये :

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला, मुलींना व विधवा पत्नी यांना पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणे सुलभ होण्याकरीता.